i. **HOD’s Message:**




प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

सदैव सृजनशीलता आणि सर्जनशीलताजपणाऱ्या मराठी विभागात आपले सहर्ष स्वागत आहेया . विभागानेस्थापनेपासूनच नेत्रदीपक अशी प्रगती केली आहेविशेष म्हणजे महाविद्यालयाच्या अध्यापन ., संशोधन व विस्ताराच्या कामांमध्ये हा विभाग सतत सक्रिय राहिला आहेया विभागाचा प्रमुख या नात्याने . मयीन कौशल्य विकसित करण्यावर.काम करताना विद्यार्थ्यांमध्ये भाषिक आणि वांग्ड्भर दिला जातो . त्याच बरोबर .तसेच साहित्यविषयक जाण वृद्धिंगत करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती सृजनशीलता निर्माण करण्यासाठी हा विभाग मराठी साहित्याभ्यास, भाषा व बोली अभ्यास संशोधन आणि सामाजिक, सांस्कृतिक व वांग्ड्म.यीन सहसंबंधासाठी सकारात्मकरीत्या विद्यार्थ्यांना प्रेरणा देतो.

मराठी राजभाषा दिन, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा यानिमित्ताने ग्रंथ दिंडी, विविध तज्ञांची व्याख्याने, लेखकांशी संवाद, मुलाखती, चर्चा, अभिवाचन, काव्यवाचन तसेच ग्रंथ प्रकाशन इत्यादी विविध उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी आत्मीयता, भाषेची विविध कौशल्ये, साहित्या विषयाची जाणीव निर्माण केली जातेतसेच वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी असणाऱ्या मराठी भाषक . व्यक्तींना आमंत्रित केले जाते.

मराठी भाषेचा प्रचारप्रसार या उद्दिष्टांसह विद्यार्थ्यांना- भाषांतर, व्यावसायिक लेखन, ऑनलाईन पुस्तक विक्री अशा रोजगाराभिमुख उपक्रमासाठी प्रोत्साहन दिले जातेविशेष बाब म्हणजे या विभागाने केलेल्या . प्रयत्नांचे फळ म्हणून विभागाचे माजी विद्यार्थी मराठी चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम लेखक, दिग्दर्शक, निर्माता श्री प्रवीण .तरडे, नाट्यअभिनेता व नाट्य दिग्दर्शक अतुल पेठे आज ज्येष्ठ रंगकर्मी म्हणून ओळखले जातातया विभागाने आजवर निकालाची उत्कृष्ट परंपरा ., उपक्रमशीलता आणि शिस्त यांच्या बळावर अनेक नवे विक्रम सिद्ध केले आहेत भविष्यातही हा विभाग आदर्शाचे नवे आयाम निर्माण करेल . याचीमला खात्री आहे.

विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या मराठी विभागाच्या माजी विद्यार्थ्यांना मी असे आवाहन करतो की, त्यांनी विभागाशी सतत संपर्कात राहून आपल्या प्रगतीची नोंद करावीव विभागाच्या .दैदीप्यमान वाटचालीत सहभागी व्हावे.

डॉसदाशिव पाटील .
मराठी विभागप्रमुख